# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/10/2023 (बुधवार) दुपार

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा शास्त्री चौक काटोल येथे फिर्यादी नामे– रोशन भिमराव शेंडे वय ३६ रा. सोनबा नगर वाडी नागपुर जि. नागपुर याचे कापडाचे दुकान शास्त्री चौक काटोल येथे असुन दिनांक १७/१०/२०२३ रोजी चे रात्री २३/०० वा. दुकान बंद केले त्यानंतर रात्री ०२/३० वा. दरम्यान फिर्यादीचे दुकानाचे शर्टर कोणीतरी अज्ञात ईसमाने वाकुन आत प्रवेश करून दुकानाच्या गल्ल्यामधुन अंदाजे ८०००/—रूपये रोख तसेच शेजारी असलेले रोशन मंगलराव मसुले वय ३२ वर्ष रा. आयुडीपी काटोल यांचे रत्नदिन मोबाईल शॉपीचे सुदधा शटर वाकवुन गल्ल्यामधुन अंदाजे २०००/—रू. रोख आणी चंद्रहास व्यास रा. काटोल यांचे मालकीचे व्यास डेली निडस दुकानाचे शर्टर वाकवुन दुकानाचे गल्ल्यामधुन ५००/— रू. रोख असे एकुण १०,५००/— रूपये रोख कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानाचे शर्टर वाकुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी कोलटे मो. न. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द
## पोलीस स्टेशन देवलापार ची कार्यवाही

दिनांक १६/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ देवलापार हद्दीत पेट्रोलिंग करित असताना मुखबिरद्वारे खबर मिळाल्याने स्टाफने मौजा गोबरवाही हिवराबाजार रोड येथे नाकाबंदी केली असता एक टिप्पर येतांना दिसला. सदर १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच.— ४०/एम— ३५२७ यास थांबवुन तपासले असता सदर वाहनात चालक **आरोपी नामे— दुश्यंत शेषराव हुके, रा. वलनी ता. सावनेर जि. नागपुर** यास गाडी मध्ये कोणता मुद्देमाल आहे असे विचारले असता चालकाने गाडी मध्ये रेती आहे असे सागितले. त्याला रेतीच्या परवाना बाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले व सदर रेती पोनगट्टा एमपी मधुन चोरुन आणल्याचे सागितले. १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच.— ४०/एम—३५२७ मध्ये १० ब्रास रेती अवैधरित्या विना परवाना चोरुन आणल्याचे दिसुन आल्याने आरोपीचे ताब्यातील १० ब्रास रेती ३०००/— रु. ब्रास प्रमाणे ३०,०००/— रुपयाचा मुद्देमाल व १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच.— ४०/एम.— ३५२७ किंमती अंदाजे ४,०००,०००/—रू. असा एकुण ४,०३०,०००/— रुपयाचा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना चोरुन आणल्याचे दिसुन आल्याने सदरचा टिप्पर रेतीसह जप्त करुन ताब्यात घेतला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशि केशव फड, पोस्टे देवलापार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमिन महसुल कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रंगारी पोस्टे देवलापार मो नं ९५२७१३१५५६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर